Vol 5 Issue 6 May 2016
ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

# Review of Research

**International Online Multidisciplinary Journal**

ISSN: 2249-894X    Impact Factor : 3.1402(UIF)    Volume - 5 | Issue - 6 | March - 2016


## ''बौध्द धम्मातील अनित्यता सिद्धांत ''





*संदेश वाघ*

*सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ.*


### 1. प्रस्तावनाः

संयुक्त निकायातील सुसिम परिब्बाजक सुत्तात भगवान बुद्ध म्हणतात जे जन्मास येते ते सर्वच अनित्य आहे. एक ना एक दिवस अनित्य सत्याच्या आधारे जन्मास आलेल्या प्रत्येक संस्कारास एक क्षणी मृत्यूला जाने हे नैसर्गिक अटळ सत्य आहे.

बुद्ध सांगतात रूप, वेदना, संज्ञा संस्कार आणि  विज्ञान अर्थात पंचउपदान स्कंध सुद्धा अनित्य आहेत. निसर्गात जन्मास आल्यानंतर ज्याला मी, माझे व माझ्याकरीता म्हणून त्या प्रती अनंत अमर्याद तण्हा (तृएणा) उत्पन्न करतो व ज्या क्षणी मी सोडून जातो तेव्हा त्याच्या क्षयाणे मानवास अत्यांतिक टोकाचे दुःख उत्पन्न होते.

संपूर्ण दुःखातून मुक्त होण्यासाठी भुतकाळातील, भविष्यकाळातील किंवा वर्तमान काळातील प्राप्त असलेले 'रूप' ते अंतर रूप असो किंवा बाहयरूप, स्थूल असो व सुक्ष, ते सर्वच ना मी आहे ना माझ्यासाठी आहे असे जानुण त्या अनित्य सिद्धांताचा चांगल्या यथार्थ तऱ्हेणे आचरण केले असता त्यांच्या क्षयाने मानवास दुःख उत्पन्न होत नाही.

आपल्या षड़ायतन व त्यातून उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक विषयाच्या प्रती जर वैराग्य उत्पन्न झाले तर त्यामुळे सर्व विषयातून (बंधन) मानवाची मुक्ती होते. सर्व अनित्य बंधनातुन विमुक्तिचा साक्षात्कार झाल्यानंतर मानवास निब्बाण या दीर्घ सुखाचा साक्षात्कार होतो.

*2) स्वरूपः*

अनित्यता हे तीन लक्षणात पाहीले पाहिजे. जे अनित्य आहे ते दुःख आहे. जे दुःख आहे ते मी नाही जे मी नाही ते माझ्याकरीता नाही.

जे नित्य नाही ते अनित्य आहे. जगातील सर्वच बाबी अनित्य आहेत. निसर्गात निब्बाण हेच केवळ शाश्वत आहे.

अनित्यता स्वरूपास विषद करतांना बुद्ध राध सुत्तात सांगतात. रूप अनित्य आहे, वेदना अनित्य आहेत. संज्ञा अनित्य आहे, संस्कार अनित्य आहेत आणि विज्ञान अनित्य आहे.

ज्याला पंचउपादान्स्कंधाच्या नित्य व अनित्य अस्तित्वाचे ज्ञान व झालेल्या त्या अवस्थेस ' अविद्या ' युक्त अवस्था म्हणतात.

अविद्येतुनच पंचउपादान स्कंधांचा जन्म होतो. यावरून अविद्या नष्ट करण्यासाठी ' अनित्यता ' समजणे किती महत्त्वपूर्ण आहे, याची आपणांस जाणीव होते.

अनित्य लक्षण म्हणजे वस्तुमात्रातील होणारे बदल, परिवर्तन, विपरिणाम आणि अन्यथाभाव.

विपरिणाम म्हणजे सद्यः स्थितीत असलेल्या गोष्टीत सर्वच बाबतीत बदल होणे. म्हणजे जे वस्तुमात्र सद्यः स्थितीत आहेत ते त्या स्थितीत न राहणे.

अन्यथा भाव म्हणजे त्यानंतर होणारा वस्तु मात्रातील पुढचा बदल या ठिकाणी ' वस्तुमात्र' पदार्थ, 'गोष्टी', हे जे शब्द वापरले आहेत ते निसर्गातील सर्वच गोष्टींबद्दल वापरलेले आहेत.

मानसिक आणि भौतिक, नाम आणि रूप यांच्यातील होणारा बदल यांस विपरिणाम आणि अन्यथा भाव असे सुद्धा म्हणतात. विपरिणाम आणि अन्यथा भाव या दोन स्थित्यांतर बदल अवस्थांचा सुक्ष्म आणि बारकाईने अभ्यास केला असता जगात (निसर्गात) जन्मास आलेल्या सर्वच बाबी कशा अनित्य आहेत हे आपणांस दिसून येते.

*3) अनित्यता व पंचस्कंधः*

रूप, वेदना, संज्ञा संस्कार आणि विज्ञान या प्रत्येकाचे स्वरूप परावर्तीत स्वरूपाचे आहे. प्रत्येक स्कंध हा अनित्य आहे.

रूप - नाम यात होणारे परिवर्तन नामाचे चार घटक आहेत.

१) वेदना
२) संज्ञा
३) संस्कार
४) विज्ञान

बाहय जगाचा होणारा अनुभव हा वरील चार घटकामुळे होत असतो. उदा. जेव्हा आपण निसर्गातील एखादी बाब पाहतो. तेव्हा आपली डोळे आणि चक्षु विज्ञान यांचा संपर्क झाला तरच त्या गोष्टीचे अस्तिव आपणांस जाणवते. त्याचप्रमाणे सर्व षड़ायतन आणि षड़ायतनाचा विज्ञानाशी संपर्क व त्यातुन उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक जाणीवा (अनुभव) अस्तित्व रूपाने पाहावयास मिळतात.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते की, षड़ायतन त्यांचे विषय इंद्रिय विज्ञान यावर अवलंबून आहे. आणि विज्ञान अनित्य आहे, म्हणून वरील सर्व पंचउपादानस्कंध सुद्धा अनित्य आहेत. म्हणजेच विपरिणाम धर्माचे आणि अन्यथा भावाचे परिणाम दिसतात. पंच स्कंध अनित्य आहेत कारण त्यांचा उदय होत असतो, लय होत असतो आणि त्यांच्यात सतत परिवर्तन होत असते.

अनित्यता धर्म म्हणजे उदय व अस्त या दरम्याण घडणाऱ्या बदलास पाहणे (अनुभवणे)

*4) अनित्यता व परिवर्तनशीलता :*

सर्व प्रतित्यसमुत्पन्न बाबी परिवर्तनशील आहेत. एक निब्बण अवस्था सोडली तर प्रत्येक संस्कार परिवर्तनशील आहे. निसर्गातील प्रत्येक वस्तुमात्र प्रतित्यसमुत्पन्न आहे, म्हणून ती अनित्य आहे. सत्वाचा उदय आणि त्याच्यातील बदल जुण्याचा क्षय (अस्त) होणे नव्या संस्कारास स्विकारणे हा अनित्यवादाच्या परिवर्तन स्वभावास सिद्ध करते.

मानवसत्व म्हणून ज्या बाबी सर्वस्वरूपाने अनित्य आहेत. ती प्रत्येक बाब परिवर्तनशील संस्काराशी एक रूप आहे. मानवाच्या संस्कारात अशी कोणतीच बाब नाही जी स्थिर व अपरिवर्तनशिल आहे. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पैकी एकही बाब अशी नाही की, जी शाश्वत, चिरंतन व अपरिवर्तनीय आहे. मानवाचे सर्व संस्कार भुतकाळातील - ते सर्व आज वर्तमानकाळात परिवर्ततीत झाले आहेत सर्व संस्कार अध्रुव, अनित्य व क्षनभंगूर असतात.

तेव्हा सर्व संस्कारापासून विरक्त होणे, कल्याणकारी आहे, उत्तम आहे. सर्व संस्काराचा क्षय करून त्यातून मानवाचा उत्तम तऱ्हेणे उपदेशीलेला मानवी दुःख मुक्तीचा मार्ग आहे.

*5) अनित्यता व स्थितीः*

अनित्यतेचा दुसरा पैलू आहे स्थिती अंगुत्तरनिकायात भगवान बुद्ध म्हणतात ''भिक्खुंनो! ज्याचा उदय होतो, त्याच्या तीन अवस्था आहेत. उदय, क्षय आणि परिवर्तन (बदल) अनित्यता या तीन अवस्थेतून सातत्याने परावर्तीत होत असते.

ज्याप्रमाणे आपण बोधिवृक्षाचा अभ्यास केल्यास आपल्या लक्षात येते की, प्रांरभी काळात त्याला लागलेल्या पाणाचा रंग हा फिकट रंगाचा असतो नंतरती लालसर होतात नंतर ती काळपट लाल होवून ती हिरवीगर दिसतात पुढे काही दिवसातच ते पिवळी पडून गळून पडल्यावर जमिनीवर दिसतात. त्याचप्रमाणे निसर्गाच्या प्रत्येक संस्कारात नित्यनियमाने बदल घडत असतात.

वास्तविक रूपाने संस्कारीत गोष्टींचा उदय होतो आणि दुसऱ्या क्षणी त्याचा लय होतो. सजीव सत्वात क्षणाक्षणाला बदल होत असतो. त्यालाच क्षणिक संस्कार उत्पन्न होणे व दुसऱ्याच क्षणी त्याचा लय होणे याच स्थितीत 'अनित्यतेचा' आपणास अनुभव

येतो. मानवसत्वाचा जन्म त्याचे जगणे आणि शेवटी मृत्यू या दरम्यान क्षणाक्षणाला होत असलेले परिवर्तन अनित्यता व स्थितीचे अनुभव आपणांस जाणून घेता येतात.

अभिधम्मातील उपदेशानुसार रूपाचा उदय, लय आणि बदल एका क्षणात होत असतो, तर नामाचा उदय, लय आणि परिवर्तन क्षणाच्या सोळाव्या भागात होत असते.

### *6) अनित्यता व निश्चित स्वरूपः*

अनित्यतेचा तिसरा पैलू म्हणले निश्चित स्वरूपाच्या प्रत्ययांवर म्हणजे कारणांवर अवलंबून असते. अर्थात निश्चित स्वरूपाच्या कारणांमुळे निश्चित स्वरूपाच्या गोष्टींचा उदय होत असतो. तो निश्चित स्वरूपाची कारणे उपलब्ध नसतील तर निश्चित स्वरूपाच्या बाबींचा उदय (जन्म) होणे अशक्य आहे.

मज्झिमनिकायातील चूलसकुलदायि सुत्तात भगवान बुद्ध म्हणतात

'' इमस्मि सति इदं होति ।।
इमस्मि असति इदं न होति ।।

याच्या होण्यामुळे हे होते, आणि याच्या न होण्यामुळे हे होत नाही. उदा. जर कार्यक्ष चक्षू आणि चक्षू विवय नसतील तर चक्षू विज्ञानाचा उदय होत नसतो. चक्षू विज्ञान अस्तित्वात येत नसते. चक्षू व चक्षू विज्ञान विषय अनित्य आहेत ते लय व परिवर्तनशील आहेत येणे प्रमाणे षड़ायतनाचे विज्ञान विषय अनित्य आहेत ते निश्चित स्वरूपाच्या कारणांमुळे जन्मास येतात, लय पावतात व बदलतात.

बुद्ध सांगतात भिक्खुनो, जर मानवाचे चित्त रूपाच्या प्रती उपादानरहीत होन आश्रवांपासून विरक्त आणि विमुक्त झाले वेदना - संज्ञा - संस्कार व विज्ञान यास याथार्थपणे जाणल्यास तर ते स्थिर होतात. स्थिर झाल्यामुळे शांत होत असता. सर्व संस्कार शांत झाल्यामुळे मानवास निब्बाण अवस्था प्राप्त होते. अंतिमत सर्व अनित्य आहे ज्याच्यामुळे दुःख उत्पन्न होते ते दुःख सुद्धा अनित्य आहे हे दुःखमुक्तीचा आर्य संदेश 'प्रज्ञा' ज्ञानाने जाणावे.

भगवान बुद्ध म्हणतात, ''भिक्खुंनो,'' जर भिक्खुचे चित्त रूपाच्या प्रती वेदना संज्ञा - संस्कार आणि विज्ञानाच्या प्रत्री उपादानरहीत होवून आस्रवापासून विरक्त आणि विमुक्त झाले तर तो शांत होतो. तथागत भगवान बुद्धांनी हया सगळयाचा अनुभव घेतला आहे.

रूपाचे उत्पन्न होणे व रूपाचा अंत होणे, वेदना उत्पन्न होणे व वेदनेचा अंत होणे, संज्ञा उत्पन्न होणे व संज्ञेचा लय होणे, संस्कार व विज्ञानाचा उदय होणे व त्यांचा अंत होणे यांच्या सर्व अस्तित्वापासून, सर्व अहंकारापासून उपेक्षेने नाश केल्यामुळे, त्यांचा त्याग केल्यामुळे कोणतेच चित्त विकार न राहील्यामुळे तथागत बुद्ध यातून विमुक्त झाले आहेत.

भिक्खुंनो! तथागत उत्पन्न होवोत किंवा न होवोत हे सदैव असेच राहत असते. सर्व संस्कार अनित्य आहेत. जसे सर्व पंचउपादनस्कंध अनित्य आहेत.

### *7) सांराशः*

भगवान बुद्धांनी बुद्ध तत्वज्ञानास उपदेशीत करतांना जर मानवास आपल्या जीवनात उत्पन्न होणाऱ्या संपूर्ण दुःखावर विजय प्राप्त करण्यासाठी अनित्यता सिद्धांत समजुन घेणे आवश्यक आहे. असे प्रतिपादान केले.

निसर्गात आपल्या आसपास असणारे सर्व काही व आपण स्वतः अनित्य धम्मास एक-ना-एक दिवस स्विकारणार आहोत.

आई - वडिल, बहिण - भाऊ, नातवाईक धन - संपदा, घर, अलंकार, असे सर्वच काही आपला साथ सोडून संपणारे आहे. मी माझे माझ्याकरीता ही भावना संपल्याशिवाय अनित्यता सिद्धांताचा अनुभव होणे कठीण आहे.

आपणच आपले नाही तर, मग कुटला निसर्ग कुठले संबंधी, नातलाग जन्मास आलेली प्रत्येक घटना - सत्व हा अनित्यता सिद्धांताप्रमाणे परिवर्तनशील आहे.

निसर्गात घडणाऱ्या परिवर्तनास समजून घेतले नाही तर दुःख उत्पन्न होणे नैसर्गिक आहे. जन्म आहे तर, म्हात्थारपण आहे, म्हात्थारपण आहे आजार आहे, आजार आहे तर मृत्यू आहे. या परिवर्तनीय प्रवासाला नैराश्यातून पाहिले असता मानवास दुःख होते. अनात्मता व अनिस्मता या दोन समूह सिद्धांताचे ज्ञान आत्मसात केले असता मानव निसर्गातल्या मानरवासंबंधीत असलेल्या कोणत्याही वस्तू वा मानवात लोभ मूलक भावनेतून न जगता 'समय' भाव म्हणून पाहतो. प्रत्येक गोष्ट आणि अंतः सर्व जगच हे नशवर (अनित्य) आहे व ते विनाबाकडे जात आहे.

### *9) संदर्भ :*

१) मां. शं. मोरे, 'बुद्ध धम्माचे मुळ सिद्धांत, प्रकाशन, डॉ. अशोक गायकवाड कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष १७१३/२००६, पृ.कं. ३६-५०'

२) भिक्षु जगदीश काश्यप, मिलिन्द प्रश्न, प्रकाशन - सिद्धार्थ बुक्स, दिल्ली - ११००६६, प्रकाशन वर्ष - प्रथम संस्करण, २००६, पृ. कं. ४७ - ५४

३) भदन्त तिस्सवंस महास्थविर, अभिधम्मविरक सार, प्रकाशक, सुगत प्रकाशन, नागपूर - १७, प्रकाशन वर्ष, १८/१/२०१०, पृ. कं. १६८, १८०.

*तळटीपाः*

१) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, बुद्ध आणि त्यांचा धम्म, प्रकाशक, प्रदीप ललिकाबाई, गायकवाड, नागपूर - १७, प्रकाशन वर्ष, २००६, पृ.क्रं. ३६७.
२) मा. रां. मोरे, बुद्ध धम्माचे मुळ सिद्धांता प्रकाशक डॉ. अशोक गायकवाड, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रकाशन वर्ष, १७/३, २००६, पृ.क्रं. ३६
३) कित्ता, पृ.क्रं. ३७
४) कित्ता, पृ.क्रं. ३८
५) कित्ता, पृ.क्रं. ३८
६) कित्ता, पृ.क्रं. ४६
७) कित्ता, पृ.क्रं. ४६

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org